श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : मंदिर, प्रतिक्षालय, रहेजा इमारत व इतर ठिकाणी वाळवी, किटकनाशक, झुरळ, उंदीर, ढेकूण नाशक फवारणी करण्यासाठी वार्षिक देखभाल करार करण्याकरीता.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर इमारत, प्रतिक्षालय इमारत, रहेजा ग्रंथालय इमारत या इमारतींसह त्यांच्या बाहेरील परिसरातील सर्व ड्रेनेज लाईन्स, इमारतींतील स्टोअररूम व बेसमेंट तसेच महाप्रसाद वितरण कक्ष, जनसंपर्क कक्ष, अभिषेक नोंदणी कक्ष, पोलिस चौकी, एसआरपी रुम, बुलेटप्रूफ मोर्चे यांसह इतर ठीकाणी पेस्ट कंट्रोल (कीटक नियंत्रण) कंत्राट कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या **www.siddhivinayak.org** या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| दरपत्रके सुचना प्रसिध्दीचा वार व दिनांक | – शुक्रवार, दि. २४ एप्रिल, २०२६ |
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – बुधवार, दि. २९ एप्रिल, २०२६, सांय ५.०० वा. पर्यंत. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | – गुरूवार, दि. ३० एप्रिल, २०२६, दु २.०० वा. |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

Vpatil
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकार

१.कामाचे स्वरुप

- श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर इमारत, प्रतिक्षालय इमारत, रहेजा ग्रंथालय इमारत या इमारतींसह त्यांच्या बाहेरील परिसरातील सर्व ड्रेनेज लाईन्स, इमारतींतील स्टोअररूम व बेसमेंट तसेच महाप्रसाद वितरण कक्ष, जनसंपर्क कक्ष, अभिषेक नोंदणी कक्ष, पोलिस चौकी, एसआरपी रुम, बुलेटप्रूफ मोर्चे यांसह इतर ठीकाणी झुरळ, मुंगी, डास, उंदिर, वाळवी, ढेकूण (गरज पडल्यास) इत्यादींचे नियंत्रण करणे.
- स्प्रेइंग, जेल ट्रीटमेंट, रोडेन्ट कंट्रोल ट्रीटमेंट इत्यादी करणे.

२.सादर करावयाची कागदपत्रे

१. तांत्रिक कागदपत्रे खालीलप्रमाणे. (लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे)

- कंपनी नोंदणी प्रमाणपत्र **Shop Act/Udyam** (MSME)
- **GST** नोंदणी प्रमाणपत्र
- **PAN** कार्ड
- **Pest Control License** (सरकारी प्राधिकरणाकडील **Insectisides Act** अंतर्गत)
- ३ वर्षाचे (वर्ष २०२२–२३, २३–२४, २४–२५) आयकर विवरण पत्र (ITR)
- सी. ए. यांचे लेटरहेडवर मागील ३ वर्षाच्या (वर्ष २०२३–२४, २४–२५, २५–२६) आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र. (सरासरी आर्थिक उलाढाल १० लक्षापेक्षा जास्त असावी) (पान क्र. ५ वरील नमुन्यानुसार)
- किमान ३ वर्षाचा पेस्ट कंट्रोल करण्याचा अनुभव (देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम केलेल्याचा अनुभव असावा. यासंबधीत प्रमाणपत्र/दाखला, कार्यादेशाची किंवा देयकाची प्रत तांत्रिक लिफाफ्या मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

२. मूल्य दरपत्रक (लिफाफा क्र. २ मध्ये पान क्र. ७ वरील नमूद **BOQ** नुसार दरपत्रक भरावे)

३. अटी व शर्ती पुढीलप्रमाणे–

१. कंत्राटाचा कालावधी
- कंत्राटाचा कालावधी दि. ०१/०५/२०२६ ते दि. ३०/०४/२०२७ असा असेल.
- कंत्राटाचा कालावधी एका वर्षाकरीता असेल.

२. दरपत्रक सादरीकरण
- A 4 आकाराच्या दोन वेगवेगळया सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावे
- दोन्ही लिफाफे लाखेने सील केलेले असावेत.
- लिफाफा १ – तांत्रिक कागदपत्रे (यात पान क्र. २ वरील सादर करावयाची कागदपत्रे मधील क्र. १ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे असावीत). दरपत्रक उघडताना कागदपत्रे अपूर्ण असल्यास न्यास समितीच्या मान्यतेने कागदपत्रे स्विकारण्याची मुभा राहील.
- लिफाफा २ – मूल्य दरपत्रक. (यात पान क्र. ७ वरील दरपत्रक भरलेले असावे).
- लिफाफ्यावर स्पष्ट नमूद करावे "श्रीसिध्दिविनायक मंदिरातील पेस्ट कंट्रोल कामाकरीता दरपत्रक", विभाग– देखभाल व दुरुस्ती, श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई.

३. सेवा वारंवारता (Frequency)
- पंधरवडयातून सेवा देणे बंधनकारक आहे.
- आपत्कालीन परिस्थितीत २४ ते ४८ तासांत सेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

४. परवाने व पात्रता
- कंत्राटदाराकडे पेस्ट कंट्रोलकरीता वैध परवाना (Insectisides Act अंतर्गत) असणे बंधनकारक आहे.
- वापरण्यात येणारी रसायने शासन मान्यताप्राप्त असावीत. (" All chemicals used shall be approved by BIS/WHO/Central Insecticides Board (CIBRC) and shall be safe for use in public places, temples and food handling areas. The contractor must submit Material Safety Data Sheets (MSDS) for all chemicals used.")

५. सुरक्षा व आरोग्य नियम
- काम करताना मंदिर परिसरातील सुरक्षा नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.
- मानवी आरोग्यास व पर्यावरणास हानिकारक नसलेली औषधे वापरणे.
- वापण्यात येणारी औषधे WHO/Government approved असावीत. तसेच मानव व पर्यावरणास सुरक्षित (Eco -friendly) असावीत.
- कामानंतर परिसर स्वच्छ ठेवणे.

अटी व शर्ती पुढीलप्रमाणे–

६. सुरक्षा अनामत रक्कम

- कार्यादेश प्राप्त झाल्यावर १५ दिवसांच्या आत कंत्राटाच्या एकूण रक्कमेच्या १० % इतकी सुरक्षा अनामत न्यासाकडे जमा करावी.
- सदर रक्कमेचा डीमांड ड्राफ्ट "श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई" या नावाने असावा.
- कामात त्रुटी आढळल्यास, काम वेळेत न केल्यास, काम निकृष्ट दर्जाचे केल्यास अथवा काम असमाधानकारक केल्यास रक्कम जप्त करण्याचा अधिकार न्यासाकडे राहील.
- कंत्राट कालावधीत काम समाधानकारकरीत्या पूर्ण झाल्यावर व कंत्राट संपल्यानंतर साधारण ६० दिवसांनंतर रक्कम परत केली जाईल.

७. कर्मचारी नेमणूक व कंत्राटदाराची जबाबदारी

- कंत्राटदाराने प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करावेत.
- कर्मचाऱ्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन केल्याचे प्रमाणपत्र न्यासास सादर करणे बंधनकारक राहील
- कर्मचारी न्यासाकडून देण्यात आलेल्या ओळखपत्रासह उपस्थित राहतील.
- प्रत्येकवेळी काम संपल्यानंतर ओळखपत्र न्यासाकडे जमा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
- कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील काम स्वत: करणे बंधनकारक राहील.
- काम करताना सुरक्षा उपकरणे (**PPE Kit**) वापरणे बंधनकारक असेल.
- कामादरम्यान झालेल्या कोणत्याही अपघातास कंत्राटदार जबाबदार राहील.
- कर्मचाऱ्यांचे वेतन, विमा व कामगार सुरक्षा (**Minimum Wages Act, EPF , ESIC, Contract Labour Act**) याची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
- कामगार विमा (**Workmen Compensation Insurance**) असणे आवश्यक.

८. देयके

- देयके मासिक पध्दतीने दिले जाईल.
- देयकात सर्व प्रकारचे खर्च मिळून मूळ दर नमूद करावे.
- जीएसटी वगळून देयक सादर करावे.
- बिल सादर केल्यानंतर शक्यतो ३० दिवसात देयके अदा करण्यात येईल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

अटी व शर्ती पुढीलप्रमाणे–

९. करारनामा व कायदेशीर बाबी

- कंत्राटदाराने न्यासासोबत रु. ५००/– च्या स्टॅम्प पेपरवर लेखी करारनामा करणे बंधनकारक राहील.
- करारनामा हा कंत्राट कालावधीसाठी वैध राहील.
- करारनाम्यात नमूद अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.
- कामात त्रुटी आढळल्यास, काम वेळेत न केल्यास, काम निकृष्ट दर्जाचे केल्यास अथवा काम असमाधानकारक केल्यास कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल.
- कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

१०. इतर अटी

- दरपत्रक धारक हा हिंदू असावा.
- अपूर्ण दरपत्रके अपात्र ठरतील.
- सर्व कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
- कामाच्या जागेची पाहणी (Site Visit) करणे कंत्राटदाराची जबाबदारी असेल.
- दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून दरपत्रके सादर करावी.
  दरपत्रकांसंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.
  अ. श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९९३०९४२४२८
  ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९३२४९९९०९४
  क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११
  ड. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय
  दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२

Vpatil
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र
## (सी. ए. यांचे लेटरहेडवर)

महोदय,

दाखला देण्यात येतो की, मे. ——————————————————— यांच्या व्यवसायाची वर्ष २०२३–२४, २०२४–२५, २०२५–२६ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२३–२४ | |
| २ | वर्ष २०२४–२५ | |
| ३ | वर्ष २०२५–२६ | |
| | एकूण तीन वर्षाची आर्थिक उलाढाल | |

दिनांक :– / / २०२६

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही / चार्टर्ड अकाऊटंन्ट
(नाव / सही शिक्का)

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
(Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# मूल्य दरपत्रक BOQ (बीड ऑफ कोटेशन)

| अ. क्र. | जागेचा तपशील | जागेचे क्षेत्रफळ (चौ. फूट) | एकूण मिळून दर रुपये (जीएसटी वगळून) |
|---|---|---|---|
| १ | मंदिर इमारत (तळ घर ते पाच मजले) | २७,६५० चौ. फूट | |
| २ | प्रतिक्षालय इमारत (तळ घर ते पाच मजले) | ३६,७८२ चौ. फूट | |
| ३ | रहेजा ग्रंथालय इमारत (तळ मजला ते दोन मजले) | २,८७८ चौ. फूट | |
| ४ | पोलीस चौकी, एसआरपी रुम, बुलेटप्रुफ मोर्चे इ. | ३,००० चौ. फूट | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का